**नियमित दिवाणी दावा ७६/२०१६**
**श्री. मारुती दौलत करंबळे वगैरे ७**
**वि.**
**शकुंतला भिमराव करंबळे वगैरे ८**

# नि.६३ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ नियम १ प्रमाणे अतिरिक्त मुद्दा काढणेकरिता दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे त्याच अर्जावर दाखल करून अर्जास सक्त विरोध दर्शविला आहे.

३. प्रतिवादी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, मुळातच प्रतिवादी यांनी सदर प्रकरणात कैफियत देवून वादीचा दावा मुदतीबाहेर आहे असे कैफियतमध्ये नमूद केलेले आहे. त्यामुळे मुदतीबाबतचा अतिरिक्त मुद्दा काढणे गरजेचे बनलेले आहे. तसेच मुदतीबाबतचा मुद्दा हा कायदेशीर मुद्दा आहे जो या प्रकरणाच्या निकालासंबंधीचा महत्वाचा आहे. मुदतीबाबतचा मुद्दा काढणेसंबंधीचा आदेश केलेस वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच मुदतीबाबतचा मुद्दा काढणेसंबंधीचा आदेश केलेस न्यायदानास मदत होणार आहे. तसेच सदरचा अर्ज सादर करणेस प्रतिवादीने कोणत्याही प्रकारचा विलंब केलेला नाही. दावा मुदतीत आहे हे वादी सिद्ध करतात काय याबाबत अतिरिक्त मुद्दा काढणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे सदर दाव्यामध्ये अतिरिक्त मुद्दा काढणे गरजेचे आहे. अंतिमतः प्रतिवादी तर्फे वकील यांनी सदर अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, मुळातच प्रतिवादीचा अर्ज खोटा व खोडसाळ असून तो वादीस मान्य व कबूल नाही. तसेच मुळातच मुदतीचा प्रश्न हा कायदा व वस्तुस्थिती असा अंर्तभूत असणारा प्रश्न आहे. तसेच मुदतीचा मुद्दा

न्यायालय केव्हाही काढू शकते. अंतिमतः वादी तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

५. प्रतिवादी यांचा अर्ज वादी यांचे म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. मुळातच वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांनुसार वादी यांचा दावा हा सरस निरस मानाने दावा मिळकतीचे वाटप होवून मिळणेकरिता दाखल करण्यात आलेला आहे. तसेच सदरबाबत प्रतिवादी यांनी नि. २६ येथे त्यांची कैफियत दाखल केलेली आहे. त्यामध्ये त्यांनी वादीचा दावा मदुतीबाहेर आहे असे कथन केलेले आहे. सदरबाबत नि. ५० येथे दि. २४.०२.२०२१ रोजी मे. न्यायालयाने वादमुद्दे काढलेले आहेत. त्यानंतर सदर दावा हा वादी यांच्या पुराव्याकरिता प्रलंबित होता. सदरबाबत वादी याने त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दि. १४.०२.२०२२ रोजी दिले व त्यांचा उलटतपास हा दि. १४.११.२०२२ रोजी पुर्ण झाला. त्यानंतर वादी यांनी त्यांचा पुरावा संपल्याची पुरसीस दि. २४.०२.२०२५ रोजी दिली. त्यानंतर प्रतिवादी यांनी त्यांचा पुरावा दि. ०५.०५.२०२५ रोजी दाखल केला व त्या साक्षीदाराचा उलटतपास हा दि. २१.०७.२०२५ रोजी पुर्ण झाला. सदर दावा हा प्रतिवादी यांच्या पुढील पुराव्याकरिता प्रलंबित आहे.

७. मुळातच कायद्यातील मुदतीचा प्रश्न हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. तसेच मुदत हा विषय कायदा व वस्तुस्थिती या दोन्हींशी संबंधित असल्यामुळे सदरबाबत दाव्यामध्ये दावा वाटपाचा असल्यामुळे अतिरिक्त मुद्दा काढणे योग्य होईल असे वाटते. परंतु या कामी झालेला विलंब हा दुर्लक्ष करता येणारा नाही. तसेच प्रतिवादी यांना सन २०२२ पासून पुढील बराच कालावधी अतिरिक्त मुद्दा काढण्याकरिता अर्ज देण्यास वेळ होता. सबब मी पुढील आदेश पारीत करत आहे.

# आदेश

१. प्रतिवादी यांचा नि. ६३ वरील अर्ज रक्कम रु. ७५०/– वादी यांना देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी यांनी कॉस्टस रक्कम वादी यांना दिल्यानंतर अतिरिक्त मुद्दा काढण्यात येईल.

सही/–
**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.

पन्हाळा
दि. १०.११.२०२५